**42**

# महात्मा ज्योतिराव फुल्यांचे सत्यशोधक समाजाविषयी विचार

**प्रोफेसर डॉ. शिंदे डी. व्ही.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

**डॉ. ए. एन. पवार**
प्राचार्य, शिवनेरी महाविद्यालय,
शिरूर अनंतपाळ

---

आपले समाज सुधारणेचे कार्य व्यापक व्हावे, इतरांनाही या कार्यात सामावून घ्यावे आणि आपल्यानंतर हेच कार्य त्यांनी नेटाने चालवावे या उद्देशाने प्रेरीत होवून महात्मा फुल्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाची स्थापना करण्याच्या पाठीमागची भूमिका अशी होती की, दु:खी कष्टी स्त्रिया व शुद्रातिशुद्रांच्या मुक्तीसाठी सत्यशोधक समाज स्थापन केला होता. तसेच समाजातील सर्व अनिष्ट प्रथावर जोरदार हल्ला चढविला. तसेच या समाजाद्वारे साळी, माळी, कोळी, कुंभार, ब्राम्हण आदि सर्व समाजातील लोकांचे एक व्यासपीठ तयार केले व त्याद्वारे सत्याचा आग्रह धरून समाजजागृती करण्याचा बचाव करणे हे या संस्थेचे मुख्य प्रयोजन होते. तसेच सर्व मानव प्राणी ही परमेश्वराची अपत्ये असल्याने ते सर्व समान आहेत. पृथ्वीवरील सर्व बाबीचा उपभोग घेण्याचा या सर्वांना समान अधिकार आहे. सर्वांनी आपल्या निर्मिकांची उपासना तथा प्रार्थना कोणत्याही मध्यस्थीशिवाय करावी अशा प्रकारची सत्यशोधक समाजाची शिकवण होती. या संस्थेचे सदस्य होते. सदस्यत्वासाठी जाती धर्माचा निकष नव्हता म्हणजे समाजातील सामाजिक विषमता नष्ट करावयाची असेल तर कनिष्ठ वर्गाला त्यांचे हक्क मिळाले पाहिजेत हे हक्क संघर्ष केल्याशिवाय मिळणार नाहीत हे महात्मा फुल्यांनी ओळखले होते. कारण ब्राम्हण वर्ग सहजा सहजी आपले अधिकार व हक्क आणि सवलती सोडणार नाहीत. तेव्हा सर्व शुद्रांनी संघटित होवून ब्राम्हणवादी समाजाशी संघर्ष करावा. यासाठी बहुजन समाजाला संघर्ष करावा लागेल. त्यासाठी बहुजन समाजाची संघटना होणे गरजेचे आहे. हेच कार्य महात्मा ज्योतीराव फुल्यांनी सत्यशोधक समाजाची संघटना होणे गरजेचे आहे. महात्मा ज्योतीराव फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून केले. परंतु सार्वजनिक सत्यधर्माची कल्पना महात्मा फुले यांनी १८८९ मध्ये सार्वजनिक सत्यधर्म या नावाच्या पुस्तकात मांडली. परंतु हे पुस्तक ''अर्धे छापले नाही, तोच त्यास मृत्यूने गाठले. परंतु १८७३ साली सत्यशोधक समाज महात्मा ज्योतिराव फुल्यांनी स्थापन केला होता त्यामध्ये त्यांच्या धर्मविषयक कल्पनांचा पुरस्कार केला आहे ही तत्वे सुध्दा प्रत्यक्षात महात्मा ज्योतिराव फुल्यांच्या मृत्यूनंतर संकलित स्वरूपात मांडली गेलेली दिसून येतात. सार्वजनिक सत्यधर्म जरी ग्रंथ रूपाने १८८९ मध्ये प्रसिध्द झाला असला तरी त्यात प्रतिपादन केलेली तत्व १८७३ पासुन महात्मा फुले यांच्या मनात होती ती तत्वे महात्मा फुल्यांनी ''सार्वजनिक सत्यधर्म'' पुस्तकातून घेतली आहेत ती तत्वे पुढील प्रमाणे आहेत.

१. निर्मिकाचे स्वरूप अनंत आहे म्हणूनच मानवाला ते जावुन घेता येणार नाही. तो पर्यत निर्मिकाला खुष करण्यासाठी नाम घेण्याची जरूरी नाही, नैवैद्य इत्यादीची आवश्यकता नाही. स्वर्ग–नरक इत्यादी केवळ कल्पना आहे. स्वत:च्या सुखासाठी इतरास पीडा न देणे हेच पुण्य होय.

२. सत्यवर्तन केल्याशिवाय मनुष्यप्राणी सुखी होणार नाही. ''सत्य सर्वाचे आदी घर! सर्व धर्माचे माहेर'' असे या बाबतीत महात्मा फुले म्हणतात.

३. सर्व मानव समान आहेत हे महात्मा ज्योतीराव फुल्यांनी सत्यवर्तमाने एकूण ३३ नियमातून स्पष्ट केले आहेत. त्यापैकी महत्वाची नियम पुढीलप्रमाणे आहे.

१. मुर्तीपुजा करू नये. २. स्त्री पुरूष समान मानावे. ३. इतरांना निरर्थक त्रास देवु नये. ४. परस्परांशी

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Publication | February 2020 Special Issue-06 | 0131

बंधु भावाने आचरण करावे. ५. प्रत्येकाला विचारस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य आहे. ६. असत्य बोलू नये. ७. चोरी करू नये.

वरील तत्वातुन मानव समानता स्पष्ट होते. तसेच महात्मा ज्योतीराव फुल्यांनी विश्वकुटुंबाची कल्पना स्पष्ट केली आहे ती खालील प्रमाणे आहे.

स्त्री अथवा पुरूष सर्व गावाच्या, प्रांतांच्या, देशांच्या व खंडाच्या संबंधाने अथवा कोणत्याही धर्मातील एकमेकांची कोणत्याच प्रकारची आवड निवड न करता या सर्व स्त्री पुरूषांनी भुतलावर आपले एक कुटुंब समजून एकमताने एकमेकांशी सत्यवर्तन करावे असे याबाबतीत महात्मा ज्योतीराव फुल्यांनी स्पष्ट केले आहे. या चळवळीमुळे ज्योतीरावांनी खालच्या वर्गात चैतन्य निर्माण केले. तसेच कोणताही अन्याय सहन न करण्याची प्रवृत्ती वाढीस लावली व खालच्या वर्गाला सुसंघटित केले त्यामुळे बहुजन समाजातील अनेक कार्यकर्ते या समाजाचे सकारात्मक बनले. ही सकारात्मक संख्या ३०० झाली या कार्यकर्त्यांच्या सत्कार्याने सत्यशोधक समाजाच्या अनेक शाखा विविध शहरात सुरू झाल्या. ब्राम्हणांशिवाय मराठीतून मंगलाष्टके तयार करून लग्न करण्यास सुरूवात केली व समाजातील जातीभेदाची भावना कमी करण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली ठिकठिकाणी शुद्र समाजातील मुलांसाठी शाळा सुरू केल्या. या समाजाच्या सामाजिक कार्याने प्रभावित होवून अनेक नि:स्वार्थी तरूण या समाजाकडे आकर्षित झाले.

इ.स. १८८५ मध्ये या समाजाने आपल्या झेंड्यासाठी पुण्याहून मोठी मिरवणूक काढून सामान्य जनतेला एकत्र करण्याचे महत्वाचे कार्य सत्यशोधक समाजाने केले कारण या समाजाद्वारे उभारण्यात आलेला संघर्ष हा सामाजिक, राजकीय, धार्मिक, गुलामगिरी विरूद्धचा लढा होता. या समाजातील खालच्या वर्गाची उन्नती करणे हा उद्देश होता. सामाजिक गठन करणारा तो पहिला समाज होय. या समाजाने प्रथम सामाजिक गुलामगिरी विरूद्ध व सामाजिक अन्यायाविरूद्ध समाजाची पुर्नरचनेची मागणी प्रथम केली. तसेच हजारो वर्षे पिचत पडलेल्या समाजाला दिशा देण्याचे काम महात्मा ज्योतिराव फुल्यांनी केले. त्यांच्या या कार्यामुळे ज्योतिराव फुल्यांना ''महात्मा पदवी'' देण्यात आली. महात्मा ज्योतीराव फुलेंच्या सत्यशोधक समाजामुळे समाजसुधारणेची चळवळ खेडयात आणि बहुजन समाजपर्यंत पोहचली होती. त्यामुळे सामाजिक गुलामगिरी विरूद्ध आवाज उठविता आला. समाजात चाललेली रूढी, प्रथा, परंपरा नष्ट करण्यात आली. समाजाला सामाजिक व आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात मानाचे स्थान मिळवून दिले आहे.

**संदर्भसूची**

१. डॉ.दा.धो.काचोळे, भारतीय सामाजिक विचारवंत
२. प्राचार्य, अण्णासाहेब गरूड/प्राचार्य, बी.बी. सावंत, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास
३. डॉ.दा.धो.काचोळे, भारतीय सामाजिक विचारवंत
४. प्राचार्य, अण्णासाहेब गरूड/प्राचार्य, बी.बी. सावंत, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास
५. संपा हरी नरके, य.दि.फडके, महात्मा फुले गौरव ग्रंथ खंड पहिला
६. संपा हरी नरके, य.दि.फडके, महात्मा फुले गौरव ग्रंथ खंड पहिला
७. संपा हरी नरके, य.दि.फडके, महात्मा फुले गौरव ग्रंथ खंड पहिला
८. प्राचार्य, अण्णासाहेब गरूड/प्राचार्य, बी.बी. सावंत, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास
९. प्राचार्य, अण्णासाहेब गरूड/प्राचार्य, बी.बी. सावंत, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास

❑❑❑



S.P. Mahavidyalaya, Bhoom BHOOM Dist. Osmanabad
PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad